-13-

Doct. No. I

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अंतर्गत आदेश

जा.क्र.उपनिश-१/७७(अ)/आदेश/पायोनिअर/१००४/२०१६
कार्यालय :- उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपुर श -१
१८५, आयुर्वेदिक ले आऊट, भांडे प्लॉट चौक, उमरेड,
रोड, नागपुर
दिनांक :- १०/३/२०१६

वाचा :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३(आय)(२) व ७७ अ(१)(ब-१)आणि फ मधील तरतुद

२. या कार्यालयाचे म.स.संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये कारणे दाखवा नोटीस क्र. उपनिश-१/निवडणुक/पयोनिअर/क.७७/कादानो/७३९/१५ दि.२७/०३/२०१५

---

ज्याअर्थी, पयोनिअर गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या.नागपुर ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदी अंतर्गत नोंदलेली आहे. आणि

ज्याअर्थी संस्थेच्या समितीचा कार्यकाळ संपुष्टात आला असुन संस्था सन २०१३ मध्ये निवडणुकीस पात्र असल्याचे कार्यालयीन रेकॉर्डवरुन निदर्शनास आले आहे. आणि

ज्याअर्थी निवडणुकीस पात्र सहकारी संस्थेच्या समितीने मुदत संपण्याच्या ६ महीने आधी महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे नियम ५(२) नुसार विहीत नमुना ई-२ मध्ये माहीती सादर करणे आवश्यक असुन १२०/१५० दिवस आधी तात्पुरत्या मतदार यादया ४ प्रतीत या कार्यालयात सादर करणे अपेक्षित आहे. आणि,

ज्याअर्थी या कार्यालयाचे वाचा क्रमांक १ नुसार संस्थेला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावुन उक्त बाबतीत आपले लेखी व तोंडी म्हणने सादर करण्याकरिता अवधी देऊन या कार्यालयास समक्ष उपस्थित राहण्याची संधी दिली होती . आणि,

ज्याअर्थी सदर नोटीसची आपणाकडुन दखल घेण्यात आली नाही व संस्थेच्या व्यवस्थापन समितीचा कार्यकाळ संपला असुन सुध्दा वर नमुद केल्यानुसार विहीत मुदतीत ई-२ नमुन्यात संस्थेने अहवाल सादर केला नाही व मतदार यादया ४ प्रतीत या कार्यालयास सादर केल्या नाहीत. तसेच सदर नोटीस संबंधाने संस्थेचे पदाधिकारी अथवा सदस्य यांचे कोणाचेही आक्षेप व हरकती या कार्यालयास विहीत मुदतीत प्राप्त झाले नाहीत. आणि,

ज्याअर्थी उक्त कायदयाचे कलम ७३ आय(२) मधील तरतुदीनसार संस्थेच्या समितीचे सदस्य त्यांचे अधिकारपद धारण करण्याचे बंद झाले आहे. आणि

ज्याअर्थी उक्त परिस्थितीचा विचार केला असता संस्थेच्या समितीचा कार्यकाळ २०१३ मध्ये संपुष्टात आलेला असुन सध्यास्थितीत संस्थेवर विधीवत पध्दतीने निवडुन आलेली समिती कार्यरत नाही. व सदर समिती जाणीवपुर्वक समितीची निवडणुक घेण्यास टाळाटाळ करित आहे. त्यामुळे संस्थेच्या समितीच्या रचनेत दोष निर्माण होवुन व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झालेली आहे आणि सदर परिस्थीती कायदयाचे कलम ७७ अ(१)(ब-१) मध्ये नमुद केल्याप्रमाणे आहे.आणि

त्याअर्थी उक्त परिस्थीतीत संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ(१)(फ)(२) मधील तरतुदीनुसार प्राधीकृत अधिकाऱ्याची नियुक्त करणे गरजेचे आहे अशी माझी खात्री झालेली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

R. 4/6/16

//आदेश//

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ १(फ)(२) अन्वये व महाराष्ट्र शासन, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय मुंबई -३२ यांचे आदेश क्रमांक सीएसएल २०१२/प्र.क्र.२६९/१५-सी/, दि. ११ सप्टेंबर २०१२ अन्वये तसेच अंतर्गत मला प्राप्त अधिकारानुसार मी, महेंद्र मगर. उपनिबंधक सहकारी संस्था ...

पयोनिअर गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या.नागपुर या संस्थेचा कारभार चालविण्यासाठी श्री.पी.बी.कडु, सहकार अधिकारी श्रेणी- १ यांची प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करित आहे.

संदर प्राधीकृत अधिकारी यांचा कार्यकाळ ६ महीन्याचा राहील, व त्यांनी त्यांचा कालावधी संपुष्टात येण्यापुर्वी नवीन कार्यकारणीची रचना करणेसाठी कार्यवाही करावी.

सदरचा आदेश आज दिनांक २०/०३/२०१६ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिला असे.

(महेंद्र मगर)
उपनिबंधक
सहकारी संस्था नागपुर शहर -१

प्रतिलीपी :-

१. श्री.पी.बी.कडु, सहकार अधिकारी श्रेणी – १ तथा प्राधीकृत अधिकारी यांना सुचित करण्यात येते कि, त्यांनी संस्थेकडुन तात्काळ रेकॉर्डचा पदभार प्राप्त करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
२.अध्यक्ष/सचिव पयोनिअर गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या.नागपुर यांना सुचित करण्यात येते कि, त्यांनी प्राधिकृत अधिकाऱ्यास तात्काळ संस्थेचा पदभार सुर्पद करावा.
३.मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नागपुर यांना माहीतीकरिता सविनय सादर.

उपनिबंधक
सहकारी संस्था नागपुर शहर -१

T.C.